**प्रकल्प प्रवर्तक मे. बेसी ड्रग्स प्रायव्हेट लिमिटेड, गट क्रं. २००/१, पोस्ट-लखमापूर, तालुका-दिंडोरी, जिल्हा – नाशिक (४२२ २०२), महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित सक्रिय औषध घटक (Active Pharmaceuticals Ingredients) आणि औषध मध्यवर्ती निर्मिती (Drug Intermediate) प्रकल्प विस्तारिकरणाकरिता पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचे इतिवृत -**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. बेसी ड्रग्स प्रायव्हेट लिमिटेड, गट क्रं. २००/१, पोस्ट-लखमापूर, तालुका-दिंडोरी, जिल्हा – नाशिक (४२२ २०२), महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित सक्रिय औषध घटक (Active Pharmaceuticals Ingredients) आणि औषध मध्यवर्ती निर्मिती (Drug Intermediate) प्रकल्प विस्तारिकरणाकरिता पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बुधवार, दिनांक २२ एप्रिल, २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता गट क्रं. २००/१. पोस्ट-लखमापूर, तालुका-दिंडोरी, जिल्हा-नाशिक (४२२ २०२), महाराष्ट्र राज्य येथे आयोजित करण्यात आलेली होती.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे आदेश दिनांक २१/०४/२०२६ नुसार पर्यावरणीय जनसुनावणी समिती गठित करण्यात आली होती. सदर जनसुनावणी दरम्यान समितीचे खालील सदस्य उपस्थित होते.

१. डॉ. आप्पासाहेब शिंदे, उप विभागीय दंडाधिकारी, दिंडोरी, जि. नाशिक (अध्यक्ष)
२. श्री. विद्यासागर किल्लेदार, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक, (सदस्य)
३. श्री. प्रणव पाखले, उप प्रादेशिक अधिकारी,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ , नाशिक, (समन्वयक)

श्री. प्रणव पाखले, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक यांनी सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले आणि पर्यावरण जनसुनावणी समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने जनसुनावणीच्या कामकाजास सुरुवात केली. समन्वयकांनी नमूद केले की, आज आपण मे. बेसी ड्रग्स प्रायव्हेट लिमिटेड, गट क्रं. २००/१, पोस्ट-लखमापूर, तालुका-दिंडोरी, जिल्हा – नाशिक (४२२ २०२), महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित सक्रिय औषध घटक (Active Pharmaceuticals Ingredients) आणि औषध मध्यवर्ती निर्मिती (Drug Intermediate) प्रकल्प विस्तारिकरण बाबत पर्यावरण जनसुनावणीसाठी एकत्र जमलो आहोत.

या प्रकल्पाची पर्यावरण जनसुनावणी, भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने दिनांक: १४ सप्टेंबर २००६ रोजी काढलेल्या अधिसूचनेनुसार आयोजित करण्यात आली

असून, हा प्रकल्प 'ब' श्रेणीमध्ये समाविष्ट होतो. या श्रेणीतील प्रकल्पांसाठी पर्यावरण, वने व हवामान बदल यांच्याकडून पर्यावरण मंजुरी मिळवणे आवश्यक असते; आणि या प्रक्रियेचाच एक भाग म्हणून, जनसुनावणी घेणे अनिवार्य असते. या अनुषंगाने, माननीय जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या परवानगीने, आजची जनसुनावणी दिनांक: २२/०४/२०२६ रोजी सकाळी ११:३० वाजता आयोजित करण्यात आली होती. नियमांनुसार, या पर्यावरण जनसुनावणीबाबतची सार्वजनिक सूचना ३० दिवस आधी, म्हणजेच दिनांक: १८/०३/२०२६ रोजी ' सकाळ' आणि 'टाइम्स ऑफ इंडिया' या दैनंदिन वर्तमानपत्रांमध्ये प्रकाशित करण्यात आली होती. याव्यतिरिक्त, जिल्ह्यातील संबंधित शासकीय कार्यालयांमध्ये आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर या प्रकल्पाची माहिती पुस्तिका (मसुदा पर्यावरण परिणाम मूल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश) नागरिकांच्या वाचन व अवलोकनार्थ उपलब्ध करून देण्यात आली होती.

ही माहिती पुस्तिका उपलब्ध असलेल्या ठिकाणांची यादी खालीलप्रमाणे आहे:

| | |
|---|---|
| १) | प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य झोन, न्यु सेक्रेटरीएट बिल्डिंगतळमजला ,, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन्स, नागपूर ००१ ४४० – |
| २) | मा .जिल्हाधिकारी ,जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक, |
| ३) | महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नाशिक, |
| ४) | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय,नाशिक, |
| ५) | पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, नवीन प्रशासन भवन, १५वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ |
| ६) | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, सिनेप्लॅनेट सिनेमासमोर ,३रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं .८, सायन सर्कलजवळ ,सायन) पूर्व(, मुंबई - ४०० ०२२ |
| ७) | प्रादेशिक अधिकारी,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ ,उद्योग भवन,पहिला मजला, त्रिंबक रोड, आय.टी.आय. सिग्नल जवळ, सातपूर, नाशिक – ४२२ ००७ |
| ८) | उप विभागीय अधिकारी, उप विभागीय कार्यालय,दिंडोरी, जिल्हा-नाशिक |
| ९) | उप प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन,पहिला मजला, त्रिंबक रोड, आय.टी.आय. सिग्नल जवळ, सातपूर, नाशिक – ४२२ ००७ |
| १०) | तहसीलदार,तहसील कार्यालय, दिंडोरी, जिल्हा-नाशिक |
| ११) | ग्रामपंचायत कार्यालये- परमोरी, करंजवन, लखमापूर, वरखेडा.अवनखेड, दिंडोरी, ओझरखेड,तालुका-दिंडोरी, जिल्हा-नाशिक, |
| १२) | संकेत स्थळ ,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई – मराठी व इंग्रजी कार्यकारी सारांश अहवाल उपलब्ध केलेला आहे. |

समन्वयकांनी नमूद केले की, प्रकल्पाशी संबंधित कोणत्याही सूचना किंवा आक्षेप सादर करण्यासाठी ३० दिवसांचा कालावधी देण्यात आला होता. तथापि, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नाशिक येथील उप-प्रादेशिक कार्यालयाला ई-मेलद्वारे किंवा छापील प्रतीद्वारे कोणत्याही लेखी सूचना प्राप्त झाल्या नाहीत. उपस्थित नागरिकांना अशी माहिती देण्यात आली की, जर कोणालाही काही लेखी किंवा तोंडी आक्षेप, मते किंवा प्रश्न मांडायचे असतील, तर प्रस्तावित प्रकल्पाचे सादरीकरण पूर्ण झाल्यानंतर ते तसे करू शकतात.

त्यानंतर, अध्यक्षांच्या परवानगीने, प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी सविस्तर माहिती सादर करण्याची विनंती करण्यात आली.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक त्यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित सक्रिय औषधी घटक (ए.पी.आय.) आणि औषध मध्यवर्ती (ड्रग्ज इंटरमिडिएट्स) निर्मिती प्रकल्प विस्तारिकरण योजिलेले असून विस्तारिकरणानंतर प्रकल्पाची एकूण उत्पादन क्षमता ही ५४६.१२ टन प्रतिवर्ष पासून ६००.० टन प्रतिवर्ष (५३.८८ टन प्रतिवर्ष वाढ) इतकी होणार आहे.

प्रकल्प विस्तारिकरणासाठी अंदाजे खर्च ₹ २.३७/- कोटी अपेक्षित आहे. तर पर्यावरण व्यवस्थापन योजनेसाठी (ई.एम.पी.) खर्च ₹ ५.६२ लक्ष एवढी होईल. प्रकल्प प्रवर्तक यांनी सी.ई.आर. (Corporate Environment Responsibility) निधी ₹ २.३७ लक्ष ठेवलेला आहे.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार हरितपट्टा विकासासाठी प्रति हेक्टर जमिनीवर २,५०० झाडे लावणे/उपलब्ध असणे आवश्यक आहे. त्यानुसार प्रकल्प संपूर्ण क्षेत्राच्या ३३% हरितपट्टा विकसित करण्यात येईल.

प्रस्तावित प्रकल्पात उत्पन्न होणारे घरगुती सांडपाणी व औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा पुनर्वापर प्रकल्प उत्पादन प्रकियेतच करण्यात येणार आहे. प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर सोडण्यात येणार नाही. प्रस्तावित प्रकल्प हा शून्य द्रव निःस्सारण प्रकल्प आहे.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सादरीकरण पूर्ण करताना सांगितले की सदरहू प्रकल्पामुळे स्थानिक ग्रामपंचायतीच्या महसूलात वाढ होईल. तसेच स्थानिकांना रोजगाराची संधि प्राप्त होईल. त्यामुळे येथील सामाजीक, आर्थिक जीवनमानात आमूलाग्र बदल होतील. सदरहू प्रकल्प हा स्थानिक परिसर, महाराष्ट्र राज्य व देशाच्या हिताचा आहे.

सादरीकरण पूर्ण झाल्यानंतर समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी ,पर्यावरणविषयक सूचना, टीकाटिप्पणी, आक्षेप नोंदविण्याचे

आवाहन केले.  आपली भूमिका मांडताना प्रथम आपले नांव, गावाचे नांव सांगण्यात यावे.  आपले विचार, सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी  नोंदविताना जर तो मुद्दा उपस्थितांना अगोदर उपस्थित केलेला असेल, तर तो मांडण्याची आवश्यकता नाही, जेणेकरुन अधिक उपस्थितांना संधि देता येतील.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना सांगितले की आपण उपस्थित करण्यात येणा-या मुद्‌द्यांचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यात येणार आहे, तसेच सदरहू जनसुनावणीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येणार आहे.  तरी ज्यांना सूचना/आक्षेप नोंदविण्याचे आहे, त्यांनी हात वर करा, जेणेकरुन प्रत्येकाला माईकसमोर येऊन संधि देण्यात येईल.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक  / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना  दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे:-**

| अ. क्रं. | टिका टिप्पणी, आक्षेप सुचना मुददा इत्यादी नोंदविणा-या व्यक्तिंचे नाव व पत्ता | जनसुनावणी समिती / उद्योगाच्या प्रतिनिधीने दिलेले आश्वासन / उत्तर |
|---|---|---|
| १) | सौ. ज्योती विजय देशमुख, माजी सरपंच, लखमापूर, तालुका-दिंडोरी, जिल्हा- नाशिक:- यांनी मुद्दा उपस्थित केला की — <br> प्रस्तावित प्रकल्प विस्तारिकरणाविषयी आयोजित पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बाबतची माहिती येथील स्थानिकांना काहीही नव्हती. आज सकाळी समजल्यानंतर आम्ही १५-२० स्थानिक व्यक्ती येथे आलेलो आहोत. आम्ही विकासाच्या, कोणत्याही कंपनीच्या विरुध्द नाही. मात्र आमचे गाव, आमची माती आमचे पाणी याविषयी कंपन्यांनी काळजी घेतली आणि परिसरातील शेतक-यांना काहीही त्रास होणार नसेल, तर आम्ही कुठल्याही कंपन्यांच्या विरुध्द कधिच जाणार नाही.  कंपनी सुरु होईपर्यंत सगले आश्वासन देतात. पण एकदा कंपन्या सुरु झाल्या, तर स्थानिकांना कोणीही | प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की जनसुनावणीचा उद्देश हाच असतो की प्रकल्प परिसरातील लोकांच्या तक्रारी, सूचना, आक्षेप हे समजून घेणे व त्या शासनास कळविणे.  यासाठीच ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याचे निर्देश केंद्र सरकारचे आहेत.  आपण उपस्थित केलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली असून त्याचा बैठकीच्या इतिवृत्तात समावेश करण्यात येईल. त्याची निश्चितपणे केंद्र सरकार दखल घेईल. <br><br> प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रस्तावित प्रकल्पात शून्य द्रव निःस्सारण प्रणाली राबविण्यात येणार आहे. म्हणजे प्रकल्प उत्पादनात निर्माण |

| | | |
|---|---|---|
| | विचारतच नाही. हा गेले तीस वर्षांचा आमचा अनुभव आहे.<br>**<u>पुढील आक्षेप –</u>** कंपनीचा सीएसआर निधी कधिही आमच्या गावाला मिळालेलाच नाही. आपण लखमापूर फाट्यापासून गावापर्यंत बघितले, तर<br>१. रस्ता पूर्णपणे खराब आहे. आमच्या दुचाकी चालविणा-या महिलांना इतका त्रास होतो की त्यांना कंबरेच्या आजाराची दुखणी लागलेली आहेत.<br>२. आमच्या गावात कार्यरत असणा-या कंपन्यांनी आमच्या गावासाठी त्यांच्या सीएसआर निधी वापरला पाहिजे. येथील ग्रामपंचायत कार्यालयात आर.ओ. प्रकल्प (रिव्हर्स ऑसमोसिस) कार्यान्वित आहे, त्यामुळे आम्हांला आर.ओ. प्रकल्पाची गरज नाही.<br>३. जर कंपन्या शेतक-यांना हमी देत असतील की कंपनीमुळे शेतक-यांना कधीही प्रदूषणास सामोरे जावे लागणार नाही, प्रकल्पात स्थानिकांना प्राधान्य देणार असे जरी आश्वासन दिले असले तरी आमच्या गावातील किती मुलांना रोजगारात प्राधान्य देणार यांचे आश्वासन आपण अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीसमोर द्यावे, तसेच आजूबाजूच्या शेतक-यांचे जे नुकसान झालेले आहे, त्याची नुकसान भरपाई मिळावी. याबाबत लेखी निवेदन मी सादर करत आहे. | होणारे सांडपाणी प्रक्रिया केल्यानंतर त्याचा प्रकल्पातच पुनर्वापर करणे प्रकल्पास बंधनकारक करण्यात आलेले आहे. प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा एकही थेंब हा प्रकल्पाबाहेर सोडता येणार नाही. त्यामुळे परिसरातील शेतक-यांच्या शेतीवर कुठलाही दुष्परिणाम होणार नाही ही दक्षता त्यांना घ्यावीच लागते. ही झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प आहे.<br>प्रकल्पात हवेचे प्रदूषण होते, ते बॉयलरमुळे. त्यासाठी कंपनी डिझेल वापरणार असून ३० मीटर उंचीची चिमणी बसविण्यात येणार आहे. प्रकल्पात इंधनासाठी कुठलाही घन पदार्थ कोळसा, बगॅस वापरण्यात येणार नाही. प्रकल्पात हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा म्हणून स्क्रबर लावण्यात येणार आहे. पर्यावरण अनुमती कंपनीस प्रदान करताना या अटी व शर्ती पाळणे बंधनकारक असते.<br>विस्तारिकरण प्रकल्पात स्थानिकांना रोजगारात प्राधान्य देण्याची मागणी करण्यास आली. तर कंपनी व्यवस्थाने प्रकल्पात स्थानिकांना प्राधान्य देणे हे कंपनीच्याच फायद्याचे आहे. ते निश्चितच स्थानिकांना प्राधान्य देणार आहेत. आताच लखमापूर गावातील ६-७ लोक कामास असून भविष्यात ते लखमापूर गावातील व्यक्तींना रोजगारात प्राधान्य देणार असल्याचे सांगण्यात आले. |
| २) | <u>श्री. सोपान बदादे, राहणार-लखमापूर, तालुका-दिंडोरी, जिल्हा-नाशिक:-</u> <u>यांनी मुद्दा उपस्थित केला की –</u> | प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी स्पष्टीकरण दिले की सीएसआर म्हणजे कॉर्पोरेट सोशल जबाबदारी निधी (CSR |

| | | |
|---|---|---|
| | कंपनी विस्तारिकरण करत आहे, त्याबद्दल अभिनंदन. मात्र गेल्या २०-२५ वर्षांपूर्वी लखमापुर ग्रामपंचायतीने कंपनीस ना हरकत दाखल दिलेला असेल. मात्र आता विस्तारिकरण प्रकल्पासाठी स्थानिक ग्रामपंचायतीचे ना हरकत प्रमाणपत्र प्रथम प्राप्त करणे हे बंधनकारक असतानाही कंपनीने ते प्राप्त केलेले नाही. तरी<br>१. जर कंपनीने त्याप्रमाणे ग्रामपंचायत कार्यालयास तसा प्रस्ताव सादर केल्यानंतर हा विषय ग्रामसभेसमोर ठेवण्यात येईल व ग्रामसभेने मंजुरी दिल्यानंतरच आपणास विस्तारिकरण करण्यास परवानगी दिल्यानंतरच कंपनी विस्तारिकरण हाती घेऊ शकते.<br>२. येथे ३०-३५ कंपन्या आहेत. जे जे आश्वासन प्रकल्प सुरु करताना देतात, ते कधिच पाळले जात नाही. जरी कंपनीने येथे स्थानिकांना प्राधान्य देण्याचे आश्वासन दिलेले असले, तरीही ग्रामपंचायत आपणाकडून लेखी हमी घेणार आहे आणि ग्रामपंचायत आपणास स्थानिक सक्षम युवक-युवतींची नांवेसुध्दा शिफारस करणार आहेत.<br>३. सादरीकरणात आपण सीएसआर निधीबाबत उल्लेख केलेला आहे. मात्र तो स्थानिक सामाजिक कामांसाठी खर्च केलेला नाही.<br>४. आताच येथे रस्ता पूर्णपणे खराब झाल्याचा उल्लेख करण्यात आला. कंपनीच्या लोडेड गाडयांमुळेच चांगल रस्ता हा खराब झालेला आहे. तरी कंपनी व्यवस्थापनास | – Corporate Social Responsibility Fund) हा २०१३ च्या नियमांनुसार कंपनीस जो शुध्द नफा (Pure Profit) होतो, त्याच्या २% खर्च करणे अपेक्षित आहे. म्हणजे कंपनी सुरु झाल्यानंतर जो शुध्द नफा (Pure Profit) होईल, त्याच्या २% खर्च करण्यात येईल.<br>सादरीकरणात जो सीईआर (Corporate Environment Responsibility) Fund जो ₹ २.३७ दाखविण्यात आलेला आहे, तो प्रकल्प विस्तारिकरण गुंतवणूकीच्या १% बांधकाम टप्पा ते प्रकल्प कार्यान्वित होईपर्यंतचा टप्प्यापर्यंत करण्यात येणार आहे.<br>विस्तारीकरण प्रकल्पात २५ व्यक्तींना रोजगाराची संधि प्राप्त होणार आहे. बैठकीत लखमापूरच्या व्यक्तींना रोजगारात प्राधान्य देण्यात यावे ही मागणी करण्यात आलेली आहे. तर प्रकल्प प्रवर्तक रोजगारात स्थानीकांनाच प्राधान्य देणार आहेत, पण फक्त लखमापूरच्याच लोकांना देता येणार नाही, तर प्रकल्पाच्या ५.० कि.मी. त्रिज्येत असणारी लखमापूर बरोबर इतरही गावातील लोकांचा विचार हा करावाच लागले.<br>पुढील आक्षेप नोंदविण्यात आला की लखमापूरच्या ग्रामपंचायतीचे प्रथम ना हरकत प्रमाणपत्र (No Objection Certificate) प्राप्त करणे कंपनीस बंधनकारक असतानाही ते घेण्यात आलेले नाही. तर प्रकल्प प्रवर्तक हे |

| | | |
|---|---|---|
| | मी सांगू इच्छितो की रस्त्याबाबत ग्रामपंचायत कार्यालयात चर्चा होईल.<br>५. तसेच स्थानिक आरोग्य, शिक्षण व इतर प्रश्न सोडविण्यात यावेत. तसेच प्रथम ग्रामपंचायतीची पूर्व परवानगी म्हणजे ना हरकत प्रमाणपत्र आपण प्राप्त करणे आवश्यक आहे, नंतरच आपण विस्तारिकरण प्रकल्प राबवू शकता. | ग्रामपंचायत कार्यालयात येऊन अर्ज सादर करतील. |
| ३) | <u>श्री प्रमोद दळवी, राहणार-लखमापूर, तालुका-दिंडोरी, जिल्हा-नाशिकः- यांनी मुद्या उपस्थित केला की –</u><br>माझी जमिन एव्हरेस्ट कंपनीच्या समोर आहे. तर त्या कंपनीचे सांडपाणी सतत आमच्या जमिनीत येते. गेले २००६ पासून मी अर्ज करत आहे. मात्र कंपनी काहीही करत नाही. येथील जवळजवळ सर्वच आजूबाजूच्या शेतक-यांना या कंपन्यांचा त्रास होत आहे. मी नाशिकला जाऊन अर्ज देत असतो. मी अर्ज देऊन कंटाळलो. तोंडी तक्रारी करुनही कंटाळलो. त्यात ती कंपनी सांडपाणी हे रात्री सोडते. | सद्स्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की उपस्थित केलेला मुद्दा मे . बेसी ड्रग्स प्रा. लि. ह्या उद्योगाशी संबंधित नाही. तथापि, आपण उपस्थित केलेल्या तक्रारीची नोंद घेण्यात आलेली असून येत्या आठ दिवसात कंपनीची स्थळ पाहणी करण्यात येईल. जर कंपनी सांडपाणी सोडत असेल तर त्यांच्याविरुध्द पर्यावरण कायद्यांतर्गत पुढील कारवाई करण्यात येईल. त्याबाबतची माहिती आपणास कळविण्यात येईल. |
| ४) | <u>श्री रवीराज सोनावणे, जिल्हा-नाशिकः- यांनी मुद्या उपस्थित केला की –</u><br>व्यासपीठावरिल पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीमधील अध्यक्ष यांना सर्वजण ओळखतात, मात्र इतर सदस्यांना ओळखत नाही, तरी त्यांची ओळख करुन देण्यात यावी. | समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी स्वतःची व सर्व सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांची ओळख करुन देण्यात आली. |
| ५) | <u>श्री त्र्यंबक गाजरे, जिल्हा-नाशिकः- यांनी मुद्या उपस्थित केला की –</u><br>या प्रकल्पात रसायनांची (chemicals) गळती होऊ शकते काय? | प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की केमिकल प्रकल्प असला की सर्वांनाच पहिली शंका असते की केमिकल गळतीची. |

| | | |
|---|---|---|
| | | तर प्रकल्प प्रवर्तकांनी क्लोज्ड लूप सिस्टिम आणि स्क्रबर व लगेचच जराही गळती होण्याची शक्यता वाटल्यास सेन्सर ही अद्यावत प्रणाली प्रकल्पात कार्यान्वित करण्याचा प्रस्ताव प्रकल्प प्रवर्तकांनी त्यांच्या अहवालात दिलेला आहे. तर पर्यावरणात केमिकल गळती होणार नाही यांचे त्यांनी खबरदारी/नियोजन केलेले आहे. |
| ६) | सौ. ज्योती विजय देशमुख, माजी सरपंच, लखमापूर, तालुका-दिंडोरी, जिल्हा- नाशिकः- यांनी मुद्या उपस्थित केला की — <br> या कंपनीसारखी मेगाफाईन ही कंपनी आहे. ज्यावेळी त्याचे विस्तारिकरण झाले, त्यावेळी गावाला अंधारातच ठेवण्यात आलेले होते. मेगाफाईन व हेक्साबॉड कंपनीचे सांडपाणी पावसाळ्यात आमच्या गावातील नदीत सोडण्यात येते. याची नोंद घेण्यात यावी. | -- |
| ७) | श्री रविराज सोनावणे, राहणार-लखमापूर, तालुका-दिंडोरी, जिल्हा-नाशिकः- यांनी मुद्या उपस्थित केला की — <br> कंपनीच्या विरुध्द आंदोलने केली म्हणून आम्हांला तडीपार करण्यात आलेले आहे. त्यासही आम्ही सामोरे गेलेलो आहोत. ही बेसी ड्रग्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनी ही लहान कंपनी होती. तिचे विस्तारिकरण करण्याचे नियोजन आहे. आम्ही कंपनीच्या, त्याच्या विस्तारिकरणाच्या विरुध्द नाहीत. विस्तारिकरणामुळे प्रकल्पात मनुष्यबळाची गरज भासेल, त्यामुळे स्थानिक युवक-युवतींना रोजगाराची संधि प्राप्त होईल. <br> १. आम्ही कंपनीच्या विरुध्द नाही. पण स्थानिक बेरोजगाराचा मुद्दा वेळोवेळी | समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय सूचना किंवा आक्षेप उपस्थित करण्याची मागणी केली. |

| | | |
|---|---|---|
| | आम्ही शासन दरबारी सांगितलेला आहे. ही कंपनी लहान असेल, पण डालमियासारख्या मोठ्या कंपनीत किती स्थानिक लोक कामास आहेत, हा प्रश्न विचारल्यास तेथे शून्य आकडा येईल. तर ही एक कंपनी न बोलविता येथील सर्व कंपनीच्या मालकांना बोलाविले पाहिजे.<br>२. स्थानिकांना रोजगारात प्राधान्य देण्यात यावेत असे सांगितले पाहिजे, तसेच प्रदूषण नियंत्रण केले पाहिजे. येथील एकच गाव नाही तर जी १५-२० गावे आहेत, त्यातील युवक-युवतींना रोजगाराची संधी दिली व प्रदूषण नियंत्रण केले, तर आमचा परिसर सुजलाम, सुफलाम होईल.<br>३. जर कंपन्यांनी हवा प्रदूषण न होण्यासाठी योग्य उंचीची चिमणी (स्टॅक) बसविली, तर निश्चितपणे हवा प्रदूषण कमी होऊ शकते.<br>४. त्यांनी शासकीय प्रशासनास जी कंपनी प्रदूषण करत असेल, त्याच्याविरुध्द कारवाई करण्याची मागणी केली. | |
| ८ | श्री भाऊसाहेब शिवाजी मेहतर, ग्रामपंचायत सदस्य, :- यांनी मुद्या उपस्थित केला की –<br>मला अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना प्रश्न विचारायचा आहे. की आजमितीस आमच्या गावात बेकायदेशीर आठ कंपन्या चालू आहेत. येथील लोकांचे असे म्हणणे आहे की आपण त्यांना काहीच करु शकत नाही. तरी याबाबत आपण दखल घेऊन त्या आठ कंपन्याविरुध्द पुढील कारवाई करावी ही विनंती. ज्या कंपन्या नियमानुसार चालू आहेत, त्यांना गावांतील मुले नोकरीस घेण्याची आपण मागणी करतो, तर ज्या कंपन्या बेकायदेशीर आहेत, त्यांचे काय? | -- |

| | | |
|---|---|---|
| | त्यांच्याविरुध्द आपण नियमानुसार केलेच पाहिजे? | |
| ९) | श्री राहूल सोनावणे, जिल्हा-नाशिकः- यांनी मुद्दा उपस्थित केला की —<br>आता जे मुद्दे श्री भाऊसाहेब शिवाजी मेहतर यांनी मांडले, त्यास माझा पाठिंबा आहे. या बेसी ड्रग्जसाठी ही पर्यावरणविषयक जनसुनावणी ही आयोजित करण्यात आलेली आहे. बेसी ड्रग्ज कंपनीने नियमाप्रमाणे ही बैठक स्थानिक लोकांना विस्तारिकरण कळावे म्हणून ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित केलेली आहे. म्हणजे बेसी ड्रग्ज कंपनीस नांवे ठेवणे चुकीचे आहे.<br>तर गावांना न विचारता ज्यांनी ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त केले, त्या सर्व कंपन्यांची चौकशी होणे गरजेचे आहे. त्यांचे ना हरकत प्रमाणपत्र व सर्व परवाने, संमतीपत्रे (license) हे त्वरित रद्द होणे गरजेचे आहे. तरी अवैधपणे कंपन्यांवर कारवाई ही झालीच पाहिजे. | -- |
| १०) | सौ. संगिता रविंद्र दळवी, सरपंच, लखमापूर, तालुका-दिंडोरी, जिल्हा-नाशिकः- यांनी मुद्दा उपस्थित केला की —<br>येथे कार्यरत प्रकल्पाचे जे विस्तारिकरण योजिलेले आहे, त्याबाबत प्रस्तावित प्रकल्पातील पर्यावरण योजना व्यवस्थापनांबाबत सविस्तर माहिती सादरीकरणाव्दारे देण्यात आलेली आहे. प्रकल्प विस्तारिकरणाबद्दल आपले अभिनंदन. बैठकीत स्थानिकांनी सीएसआर निधीबाबत विचारणा केली व तो गावांतील सामाजिक कार्यासाठी खर्च करण्यात यावा अशी मागणी केली, ती रास्त आहे. येथे गेले तीस वर्षे कार्यरत असणा-या ब-याच कंपन्या आहेत. | -- |

| | | |
|---|---|---|
| | मात्र त्यातील ब-याच कंपन्या सीएसआर निधीबाबत योग्यप्रकारे निर्देश पाळतच नाही.<br>ब-याच कंपन्या ग्रामपंचायतीस अर्ज करताना सर्व कागदपत्रे योग्यप्रकारे सादर करतात. ईटीपी, चिमणीची उंची कागदोपत्री खूपच छान असते. पण प्रत्यक्षात ती सयंत्रणा वापरली जात नाही व त्याचा त्रास स्थानिकांना होतो. कंपनी येथे चालवतात, नफा कमवतात, मात्र स्थानिक माणसे, स्थानिक लोकप्रतिनिधींनासुध्दा कंपनी गेटजवळ अडविले जाते. तसेच स्थानिकांनी उपस्थित केलेल्या अडचणींवर उपाययोजना करण्यात याव्यात.<br>सौ. संगिता रविंद्र दळवी, सरपंच, लखमापूर यांनी - यांनी मुद्या उपस्थित केला की –<br>सांगितले की आमच्या येथेही ४-५ कंपन्या आहेत, त्यांच्याकडे ग्रामपंचायतीचे ना हरकत प्रमाणपत्र नाही.<br>त्यांनी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना पोलिस संरक्षण देण्याची मागणी केली. त्यांनी सांगितले की पोलिस संरक्षण दिल्यास, आम्हीसुध्दा परवाना नसणा-या कंपन्या बंद करुन दाखवितो. तसेच स्थानिकांनी कंपनीबाबत जे आक्षेप घेताना अर्ज केले, त्याचे निराकरण होणे महत्वाचे आहे.<br>आता या बेसी ड्रग्ज कंपनीने ग्रामपंचायतीस अर्जच केलेला नाही. पण जनता आम्हांला त्याबाबत विचारणा करते. आम्ही सीएसआर सुध्दा शाळेसाठीच वापरा असा आमचा आग्रह असतो. तसेच येथे जी पर्यावरणाबाबत चर्चा होईल, त्याबाबत ग्रामपंचायत निर्णय घेईल. | |

| | | |
|---|---|---|
| ११) | <u>सौ. ज्योती विजय देशमुख, माजी सरपंच, लखमापूर, तालुका-दिंडोरी, जिल्हा- नाशिक:- यांनी मुद्दा उपस्थित केला की -</u><br>अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना प्रश्न विचारते की ग्रामपंचायतींचे कंपन्यांना ना हरकत प्रमाणपत्र (एन.ओ.सी.) प्रदान करण्याचे अधिकार काढले आहेत काय?<br>सौ.ज्योती देशमुख यांनी विचारणा केली कंपनीस बिन शेतीचे ना हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे काय? | अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की कंपनीस शासनाच्या विविध विभागांकडून ना हरकत प्रमाणपत्र (एन.ओ.सी.) प्राप्त करणे आवश्यक आहे. तसेच प्रकल्प प्रवर्तकांनी ग्रामपंचायती कार्यालयास कळविणे आवश्यक आहे. त्यासाठी ग्रामसभेचा ठराव असणे आवश्यक आहे.<br>अध्यक्ष यांनी सांगितले की आता बिनशेतीसाठी ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करणे आता आवश्यक नाही. जर व्यवसाय करावयाचा असेल, तर एमआयडीसीला ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचा अधिकार आहे. कंपनीत १८ वर्षाखालील कामगार नाही, यासाठी कामगार विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र लागते, आता पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी ही पर्यावरण अनुमती (ई.सी.) प्राप्त करण्यासाठीच आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने पारित केलेली मानके पाळण्यासाठी काय उपाययोजना करणार हे जनतेस सांगणे बंधनकारक आहे. येथे श्री गाजरे यांनी योग्य प्रश्न विचारला की कंपनीत रासायनिक गळती होण्याची शक्यता व त्यावर योजिलेल्या उपाययोजना याबाबत माहिती विचारली. काही व्यक्तींनी हवा प्रदूषणाबाबत उपाययोजना विचारल्या. ही समिती प्रकल्प मंजूर करत नाही. भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांनी पारित केलेल्या पर्यावरण प्रभाव मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार आपण |

| | | |
|---|---|---|
| | | उपस्थित करत असलेल्या पर्यावरणीय सूचना, विचार, आक्षेप यांची नोंद घेण्यात येत आहे. त्यानुसार सुधारित पर्यावरण प्रभाव मुल्यांकन अहवाल केंद्र शासनास सादर करण्यात येतो. तेथील तज्ज्ञ समिती प्रकल्प उत्पादन प्रक्रियेमुळे वातावरणावर – जल, जमीन, पशुधन, वृक्षांवर काही परिणाम होणार आहे का हे तपासते व नंतरच पुढील निर्णय घेण्यात येतो.<br>अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी ग्रामअधिकारी यांना ग्रामपंचायतकडून कोणते ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक आहे, याबाबत माहिती विचारली. ग्रामअधिकारी यांनी सांगितले की कंपनीने व्यवसाय करण्यासाठीचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक आहे? अध्यक्ष यांनी मत मांडले की ते व्यवसाय सुरु करतानाच प्राप्त केलेले असून विस्तारिकरणासाठी आवश्यक असलेले ना हरकत प्रमाणपत्रासाठी कंपनीने अर्ज करण्याची सूचना करतो. ग्रामसभा त्याबाबत पुढील निर्णय घेईल. |

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की बैठकीत स्थानिकांनी विविध पर्यावरणीय विषयांवर सूचना, प्रश्न विचारले व त्यास पर्यावरण सल्लागार यांनी समर्पक उत्तरे दिली. त्याचप्रमाणे उपस्थित ग्रामपंचायत सदस्य, सरपंच यांनी उपस्थित केलेल्या आक्षेपांना मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी दिलेल्या स्पष्टीकरणाने लोकप्रतिनिधींचे समाधान झालेले आहे. त्यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय सूचना, आक्षेप असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करताना सांगितले की बैठकीच्या सुरवातीस व चर्चेमध्ये बैठकीचा उद्देश सांगण्यात आलेला आहे. बैठकीत उपस्थितांनी विविध मुद्द्यांवर सूचना, विचार, आक्षेप नोंदविले. ते पुढीलप्रमाणे -

अ) कंपनीने स्थानिक युवक, युवतींना रोजगारात प्राधान्य दिले पाहिजे. अध्यक्ष यांनी प्रकल्प प्रवर्तकांना सूचना केली की स्थानिकांच्या भावना रास्त आहेत. स्थानिक युवक, युवतींची शैक्षणिक अहर्ता पाहून कंपनीच्या गरजेनुसार त्यांना रोजगाराची संधि देण्यात यावी.

यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की १९९० सालापासून हा प्रकल्प कार्यरत असून प्रकल्पात आजूबाजूच्या गावातीलच कर्मचारी काम करत आहेत. त्यावेळी अध्यक्ष यांनी सूचना केली प्रकल्प हा लखमापूर गावात असल्याने लखमापूर रहिवाशांना प्राधान्य देण्यात यावे अशी लखमापूरवासियांची मागणी आहे, तर त्यांना प्राधान्य देण्यात यावे.

ब) कार्यरत प्रकल्पातील सीएसआर व विस्तारिकरण प्रकल्पाचा सीएसआर निधींतर्गत लखमापूर ग्रामस्थांनी उपस्थित केलेल्या रस्त्याची दुरुस्ती करण्यात यावी, त्या कामास प्राधान्य देण्यात यावे.

क) पर्यावरण सल्लागार यांनी सविस्तरपणे प्रस्तावित प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत सांगितलेली आहे. प्रस्तावित प्रकल्प हा झेडएलडी (शून्य द्रव निःसारण) प्रकल्प असून प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर जाणार नाही, तसेच चिमणीची उंची व क्षमतेमुळे हवा प्रदूषण होणार नाही असे प्रतिपादन केलेले आहे. यावर लक्ष स्थानिक महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ कार्यालय, नाशिक यांनी ठेवावे. प्रकल्प परिसरातील शेतक-यांचे नुकसान या प्रकल्पामुळे होणार नाही याची काळजी घ्यावीच लागणार आहे. तसेच इतर सांडपाण्याबाबत/घरगुती सांडपाण्याबाबत काळजी घेण्यात यावी.

ड) येथील ग्रामपंचायत हद्दीतील शिक्षण, आरोग्याचे प्रकल्पाबाबत ग्रामपंचायतीची जी मागणी असेल, त्या प्रकल्पांना सीएसआर निधितंर्गत मदत करणे गरजेचे असुन पर्यावरण सल्लागार यांनी याबाबत पुढाकार घ्यावा व प्राधान्यक्रम निश्‍चित करून टप्याटप्याने कार्यवाही करावी.

इ) बैठकीत श्री गाजरे यांनी रसायन गळती (chemical leakage) बाबत योग्य मुद्दा उपस्थित केला. त्यास मी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती म्हणून सहमत आहे. अपघात टाळण्यासाठी अत्याधुनिक सयंत्रणा कार्यान्वित करण्यात यावी, तसेच त्याची वेळोवेळी देखभाल करण्यात यावी.

ई) बैठकीत अवैध कंपन्या कार्यरत आहेत असा आक्षेप नोंदविण्यात आलेला आहे. ही बाब प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नाशिक यांच्या निदर्शनास लेखी स्वरुपात आणून देण्यात यावी. तसेच ग्रामपंचायत लखमापूर यांनी सदर बाबत स्वतंत्र अर्ज प्रादेशिक

अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नाशिक, यांच्याकडे सादर करणे बाबत सूचित केले .

उ) बैठकीत सरपंच मॅडम यांनी अवैध कंपन्या बंद करण्यासाठी पोलिस संरक्षण मागितलेले आहे. तर आपण ज्या पोलिस कार्यालयाच्या हद्दीत काम करणार आहात, त्यांना भेटून रितसर लेखी निवेदन देण्यात यावे. पोलिस विभाग नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करेल. तसेच पोलीस विभागाकडून सहकार्य न मिळाल्यास माझ्याशी संपर्क करणेबाबत अध्यक्ष यांनी सूचित केले.

ऊ) बैठकीत येथील काही कंपन्या रात्री ब-याचवेळा प्रदूषण करतात असे सांगितले. तर सद्स्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी लेखी तक्रार देण्याची सूचना केलेली असून आठ दिवसात कारवाई करण्याचे आश्वासन दिलेले आहे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना,आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे. तरीही कोणाला प्रस्तावित प्रकल्पाविषयी लेखी सूचना, आक्षेप नोंदवालयाचे असल्यास ते आज संध्याकाळ ६.०० वाजेपर्यंत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्रत्यक्ष किंवा ईमेल व्दारे सादर करु शकता. ते बैठकीच्या इतिवृत्त, सुधारित पर्यावरण प्रभाव मुल्यांकन अहवालासोबत शासनास सादर करण्यात येतील.

मा. अध्यक्ष यांनी मोठ्या संख्येने स्थानिक उपस्थित राहिल्याबद्दल त्यांचे आभार मानले व पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी कार्यवाही संपन्न झाल्याचे घोषित केले.

त्यावेळी प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक यांनी सीईआर साठी जे ₹ २.३७ लाख राखीव ठेवलेले आहेत, त्यास संबंधित ग्रामपंचायतीने परवानगी दिल्यास राखीव निधी हा रस्ता दुरुस्तीसाठी वापरण्यात येईल.

**<u>सौ. संगिता रविंद्र दळवी, सरपंच,लखमापूर,तालुका-दिंडोरी,जिल्हा-नाशिक यांनी</u>** सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना विचारणा केली की आपणाकडे एखादा उद्योग जेव्हा पर्यावरण संमती घेण्यास येतो, त्यावेळी आपण त्यास ग्रामपंचायचे ना हरकत प्रमाणपत्र आहे वा नाही हे तपासता का?

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उत्तर दिले की नियमाप्रमाणे जर ग्रामपंचायत हद्दीत जर प्रकल्प उभारणी होत असेल, तर प्रथम ग्रामपंचायतीचे ना हरकत प्रमाणपत्र मागविण्यात येते, नंतरच संमतीपत्र प्रदान करण्यात येते. आता हा प्रकल्प १९९० पासून कार्यरत आहे. म्हणजे प्रकल्पाकडे ग्रामपंचायतचे ना हरकत प्रमाण पत्र (एन.ओ.सी.) असणार. तर बैठकीत चर्चा

केल्यानुसार विस्तारिकरणासाठी प्रकल्प प्रवर्तक हे ग्रामपंचायतीस अर्ज सादर करतील व आपण एन.ओ.सी. प्रदान केल्यानंतरच पुढील कार्यवाही करण्यात येईल.

जनसुनावणीचे समन्वयक श्री. प्रणव पाखले, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नाशिक यांनी उपस्थित नागरिकांनी मांडलेल्या सर्व मुद्यांची यथोचित नोंद घेण्यात आली असून त्यांचा समावेश जनसुनावणीच्या इतिवृत्तामध्ये केला जाईल, तदनंतर संयोजक श्री. प्रणव पाखले, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नाशिक यांनी मा. अध्यक्ष यांच्या मान्यतेने उपस्थित नागरिकांचे आभार मानुन जनसुनावणी संपन्न झाल्याचे जाहीर केले.

सदर पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी दरम्यान प्राप्त झालेल्या एकूण **०१** लेखी सूचना/आक्षेप सोबत जोडलेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| **(प्रणव पाखले)** | **(विद्यासागर किल्लेदार)** | **(डॉ. आप्पासाहेब शिंदे)** |
| समन्वयक, | सदस्य, | अध्यक्ष, |
| तथा प्र. उप प्रादेशिक अधिकारी, | तथा प्रादेशिक अधिकारी | तथा उप विभागीय दंडाधिकारी, |
| म.प्र..नि. मंडळ, नाशिक | म.प्र..नि. मंडळ, नाशिक | जि. नाशिक |